# विषप्राशनाने शेतकऱ्याची आत्महत्या

## शिराळा येथील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.25)** – नापिकी आणि कर्जाच्या तणावातून एका शेतकऱ्याने विष प्राशन केल्याची दुर्दैवी घटना वलगाव पोलीस ठाणे हद्दीतील शिराळा गावात घडली. उपचारादरम्यान संबंधित शेतकऱ्याचा मृत्यू झाला. मृत शेतकऱ्याचे नाव सुनील पंजाबराव वडे (वय 56, रा. शिराळा) असे आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सुनील वडे यांची शिराळा शेतशिवारात शेती आहे. मात्र यावर्षी शेतीत अपेक्षित उत्पन्न न मिळाल्याने तसेच बियाणे व शेतीकामासाठी घेतलेल्या कर्जामुळे ते मानसिक तणावाखाली होते. या चिंतेतूनच त्यांनी 13 जानेवारी रोजी विषारी औषध प्राशन केले. ही बाब लक्षात येताच कुटुंबीयांनी त्यांना तत्काळ जिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी त्यांना पीडीएमसी रुग्णालयात हलविण्यात आले. तेथे उपचार सुरू असतानाच 24 जानेवारी रोजी सुनील वडे यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी मृतकाच्या मुलाने दिलेल्या जबाबावरून वलगाव पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास सुरू आहे.

# महापौर-उपमहापौर निवडणुकीची रंगत वाढली

## मनपातील सत्तासमीकरणांवर सर्वांचे लक्ष



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.25)**– अमरावती महानगरपालिकेतील महापौर व उपमहापौर पदासाठीच्या निवडणूक प्रक्रियेला वेग आला असून, नामनिर्देशन पत्रांची उचल सुरू होताच शहरातील राजकीय वातावरण तापले आहे. 25 जानेवारीपासून उमेदवारांनी नामनिर्देशन पत्रे उचलण्यास सुरुवात केल्याने पक्षीय हालचाली, बैठका व रणनीतींना गती मिळाली आहे. आगामी निवडणूक केवळ पदांपुरती मर्यादित न राहता, मनपातील सत्तासंतुलन कोणाच्या बाजूने झुकते याची दिशा ठरवणारी ठरणार आहे.

महापौर पद 'ओपन महिला' प्रवर्गासाठी आरक्षित असल्याने या पदावर विशेष चुरस दिसून येत आहे. भारतीय जनता पक्षाकडून नगरसेविका लता रावसाहेब देशमुख यांनी महापौर पदासाठी नामनिर्देशन पत्र उचलल्याने भाजपने सुरुवातीलाच आपली तयारी दर्शविली आहे. त्या प्रभाग क्रमांक 19 (क) मधून निवडून आलेल्या असून, त्यांच्या नावामुळे भाजपच्या गोटात उत्साहाचे वातावरण आहे. उपमहापौर पदासाठी मात्र अधिक स्पर्धात्मक चित्र आहे. युवा स्वाभिमान पक्षाने अनेक उमेदवार मैदानात उतरवले आहेत. अजय मदनमोहन जयस्वाल (प्रभाग 22-ब), सचिन ओंकारराव भेंडे (प्रभाग 19-ड) आणि प्रा. प्रशांत आनंदराव वानखडे (प्रभाग 18-ड) यांनी या पक्षाकडून नामनिर्देशन पत्रे उचलली आहेत. याशिवाय, भाजपकडून लता रावसाहेब देशमुख यांनी उपमहापौर पदासाठीही नामनिर्देशन पत्र उचलल्याने त्या दोन्ही पदांसाठी इच्छुक असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

### मंगळवारी होणार चित्र स्पष्ट

सध्या उमेदवारांची संख्या अधिक असली तरी अंतिम लढत मंगळवारी माघारीनंतरच स्पष्ट होणार आहे. संख्याबळ, गटनेतेपद, पक्षीय शिस्त, तसेच संभाव्य आघाड्या व पाठिंबा हे घटक निर्णायक ठरणार आहेत. पडद्यामागील राजकीय हालचालींना वेग आला असून, नेते मंडळी मतांचे गणित जुळवण्यात व्यस्त आहेत. नामनिर्देशन दाखल झाल्यानंतर आणि माघारीच्या प्रक्रियेनंतरच खरे चित्र स्पष्ट होईल. मात्र सध्या तरी महापौर व उपमहापौर निवडणुकीमुळे अमरावती महानगरपालिकेच्या राजकारणात उत्सुकता, चुरस आणि सत्तासमीकरणांवरील चर्चा शिगेला पोहोचली आहे.

# महानगरपालिकेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या गटनेतेपदी अविनाश मार्डीकर



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.25)**– नुकत्याच पार पडलेल्या अमरावती महानगरपालिकेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला 11 जागा मिळाल्या आहेत. महाराष्ट्र शासनाकडून विजयी उमेदवारांचे गॅझेट प्रसिद्ध झाल्यानंतर महापालिकेतील विविध पक्षांमध्ये गटनेता निवडीसाठी हालचालींना वेग आला आहे. त्या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने अविनाश मार्डीकर यांची गटनेतेपदी निवड करण्यात आली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून नवनिर्वाचित झालेल्या नगरसेवकांमध्ये अविनाश मार्डीकर यांच्यासह मंगेश मनोहरे, मनीष बजाज, प्रमोद महल्ले, चंदू खेडकर, शेख जफर, रतन डेंडुले, मीनल सवाई, अर्चना पाटील, ममता आवारे आणि गुड्डू उर्फ प्रशांत धर्माळे यांचा समावेश आहे. येत्या 30 जानेवारी रोजी महापालिकेत महापौर व उपमहापौर पदासाठी होणाऱ्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही गटनेता निवड महत्त्वाची मानली जात आहे. आज सर्व नवनिर्वाचित नगरसेवकांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे महासचिव (संघटन) आमदार संजय खोडके व आमदार सुलभा खोडके यांची भेट घेतली. यावेळी गटनेतेपदी निवड झाल्याबद्दल अविनाश मार्डीकर तसेच सर्व नगरसेवकांचे स्वागत व अभिनंदन करण्यात आले. अविनाश मार्डीकर हे महानगरपालिकेतील ज्येष्ठ, अनुभवी व अभ्यासू नगरसेवक म्हणून ओळखले जातात. त्यांनी यापूर्वी स्थायी समितीचे सभापतीपद भूषविले असून विविध समित्यांवरील कामाचा त्यांना समृद्ध अनुभव आहे. त्यांच्या निवडीमुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला महापालिकेत अधिक सक्षम नेतृत्व मिळाल्याची भावना व्यक्त होत असून सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# शहरात दोघांची गळफास घेऊन आत्महत्या

## प्रबुद्ध नगर व इंदिरा नगर परिसरातील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.25)** – शहरातील फ्रेजरपुरा पोलीस ठाणे हद्दीत दोन वेगवेगळ्या ठिकाणी दोन जणांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याच्या घटना घडल्या आहेत. या दोन्ही घटना 24 जानेवारी रोजी उघडकीस आल्या असून, फ्रेजरपुरा पोलिसांनी दोन्ही प्रकरणांत आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. पहिली घटना वडाळी परिसरातील प्रबुद्ध नगर येथे घडली. येथील रहिवासी श्रीकृष्ण नारायण तृपकाने (वय 55) यांनी आपल्या घरातील स्वयंपाकघरात गळफास घेऊन आत्महत्या केली. श्रीकृष्ण हे क्षयरोगाने एका आजाराने ग्रस्त होते. 24 जानेवारी रोजी श्रीकृष्ण यांची पत्नी भंडाऱ्यावरून घरी परतली असता घराचा दरवाजा आतून बंद असल्याचे दिसून आले. त्यांनी आपल्या मुलाला फोन करून माहिती दिली. मुलगा वैभव याने दार तोडून आत प्रवेश केला असता श्रीकृष्ण गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आले. या प्रकरणी मुलाच्या जबाबावरून पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.



दरम्यान, दुसरी घटना व्यंकय्यापुरा परिसरातील इंदिरा नगर येथे घडली. येथील रहिवासी विजय तातोबा खोब्रागडे (वय 58) यांनी आपल्या घरातच गळफास घेऊन आत्महत्या केली. विजय यांनाही मद्यपानाची सवय होती. दारूच्या नशेत त्यांनी आत्महत्या केल्याची शक्यता पोलिसांकडून वर्तविण्यात येत आहे. या प्रकरणी मृतकाचा मुलगा अमित याच्या जबाबावरून फ्रेजरपुरा पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास सुरू आहे.

# जागा नावावर न केल्याने ग्रामसेवकास मारहाण

## जीव मारण्याची धमकी

**अमरावती**– शिरखेड पोलिस ठाणे हद्दीतील मंगरूळ येथे 29 वर्षीय ग्रामसेवकास जागा नावावर करून दिली नाही, या कारणावरून मारहाण करून जीव मारण्याची धमकी दिल्याची घटना 24 जानेवारी रोजी घडली. याप्रकरणी ग्रामसेवक संजय लक्ष्मण इवनाते (29, रा. धानोरा तरोडा, मोर्शी) यांच्या तक्रारीवरून मोहन मधुकर मानकर (50, रा. मंगरूळ, मोर्शी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

माहितीनुसार, ग्रामसेवक संजय इवनाते हे 24 जानेवारी रोजी उपोषण मंडपाला भेट देण्यासाठी गेले असता आरोपी मोहन मानकर तेथे आला. त्याने संजय यांची कॉलर पकडत, 'माझ्या मालमत्ता क्रमांक 246 मधील 700 स्क्वेअर फूट जागा अजून माझ्या नावावर का केली नाही?' असे म्हणत त्यांना मारहाण केली. तसेच जीवे मारण्याची धमकी देत त्यांना ढकलून दिले, त्यामुळे ते पेंडालवर पडले. या घटनेनंतर संजय इवनाते यांनी शिरखेड पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यांच्या तक्रारीवरून आरोपीविरुद्ध शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास शिरखेड पोलिस करीत आहेत.

# मासोद येथे दुर्मिळ मेलॅनिस्टिक अजगर आढळला

**अमरावती**– शहराजवळील मासोद शेत परिसरात शेड्यू वनमध्ये येणारा दुर्मिळ मेलॅनिस्टिक अजगर आढळून आला. सर्पमित्र प्रेम खडसे यांनी तो सुरक्षितरीत्या पकडून वनविभागाच्या ताब्यात दिला. यंग स्नेक फ्रेंड सोसायटीचे अध्यक्ष अवि प्रकाशराव येते यांना मासोदजवळील एका शेतातून विनय सुरेशराव वैद्य यांचा फोन आला. त्यांनी सांगितले की घोणससारखा दिसणारा साप दिसून आला आहे, मात्र तो घोणस नसल्याचे स्पष्ट झाले. अवि यांच्या सूचनेनुसार प्रेम खडसे यांना घटनास्थळी पाठविण्यात आले. प्रेम खडसे यांनी पाहणी केली असता हा साप झुडपांमध्ये लपलेला होता आणि तो दुर्मिळ मेलॅनिस्टिक अजगर असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी तो सुरक्षितपणे बाहेर काढून तपासणी केली. या अजगराची लांबी सुमारे 8 फूट असून त्याची तब्येत उत्तम असल्याचे आढळले. त्यानंतर अजगराची माहिती अवि प्रकाशराव यांना देण्यात आली.

# 689 वर्षांची अखंड भक्ती; आज घुईखेडमध्ये बेंडोजी महाराजांचा महाउत्सव


## दहिहांडी व भव्य शोभायात्रेने दुमदुमणार घुईखेड नगरी

## सुप्रसिद्ध अभिनेते भारत गणेशपुरे राहणार उपस्थित




**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे, (दि.25)**– संपूर्ण महाराष्ट्रासह इतर राज्यांतील हजारो भाविकांचे श्रद्धास्थान आणि विदर्भातील एकमेव संजीवन समाधी असलेल्या श्री संत बेंडोजी महाराजांच्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त आज घुईखेड येथे भक्तांचा प्रचंड जनसैलाब उसळणार आहे. इ.स. 1337 साली श्री संत बेंडोजी महाराजांनी येथे संजीवन समाधी घेतली असून, या पवित्र सोहळ्याला यंदा 689 वर्षे पूर्ण होत आहेत. कालांतराने या ऐतिहासिक सोहळ्याला भव्य व दिव्य स्वरूप प्राप्त झाले आहे. आज सोमवार (ता. 26) रोजी काल्याचे किर्तन, गोपाळकाला, दहिहांडी व भव्य शोभायात्रेनंतर यात्रा महोत्सवाला अधिकृत प्रारंभ होणार आहे. या पवित्र दर्शनासाठी राज्यभरातून लाखो भाविकांचा जनसागर घुईखेडकडे लोटणार आहे. या सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे लोकप्रिय मराठी विनोदी कार्यक्रम 'चला हवा येऊ द्या' मधून घराघरात पोहोचलेले सुप्रसिद्ध अभिनेते भारत गणेशपुरे हे आज 26 जानेवारी रोजी घुईखेड येथे उपस्थित राहणार आहेत.




दि. 19 ते 25 जानेवारी दरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमांसह विदर्भ कन्या ह.भ.प. वैभवश्रीजी पांडे (वृंदावन) यांच्या मधुर वाणीतील संगीतमय शिवमहापुराण कथा भाविकांसाठी आत्मिक समाधान देणारी ठरली. यानंतर आज 26 जानेवारी रोजी सकाळी 11 ते दुपारी 2 या वेळेत नांदगाव खंडेश्वर येथील ह.भ.प. उमेश महाराज जाधव (आळंदीकर) यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. सायंकाळी 4 वाजता गोपाळकाला व दहिहांडी, 6 वाजता महाआरती तर 7 वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. याचदरम्यान श्री बेंडोजी महाराजांची भव्य शोभायात्रा निघणार असून, यात राज्यभरातून आलेल्या असंख्य दिंड्या सहभागी होणार आहेत. हा अद्भुत आणि भक्तिमय सोहळा पाहण्यासाठी भाविकांची अलोट गर्दी होणार असून, त्यासाठी पोलिसांचा तगडा बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. सोमवारपासून यात्रा महोत्सवालाही प्रारंभ होणार आहे. तसेच 30 जानेवारी रोजी गोत आंबील महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. भाविकांनी या पवित्र सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थानचे अध्यक्ष वसंतराव घुईखेडकर, विश्वस्त प्रविण घुईखेडकर, राजाभाऊ चौधरी व इतर पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

### 27 व 28 जानेवारीला भव्य जंगी शंकरपट

श्री बेंडोजी बाबा संस्थान व गावकरी मंडळ, घुईखेड यांच्या संयुक्त विद्यमाने 27 व 28 जानेवारी रोजी बेंडोजी बाबा एम.सी.व्ही.सी. महाविद्यालयाच्या मागील मैदानावर भव्यदिव्य जंगी शंकरपट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा दोन गटांत होणार असून, यामध्ये लाखोंची बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी बेंडोजी बाबा संस्थान, शंकरपट कमिटी, व्यवस्थापन कमिटी व ग्रामस्थ परिश्रम घेत आहेत.

### सन 1337 चा ऐतिहासिक बिल्ला

श्री संत बेंडोजी महाराजांचा इतिहास अत्यंत प्राचीन व गौरवशाली आहे. संस्थानने सन 1337 साली तयार केलेला भालदार व चोपदारांचा ऐतिहासिक बिल्ला आजही विश्वस्तांकडे सुरक्षित असून, तो या दिव्य परंपरेची आणि प्राचीन इतिहासाची साक्ष देत आहे.




## मंत्री दादा भुसे यांचा अमरावती जिल्हा दौरा

### प्रजासत्ताक दिनी मुख्य शासकीय ध्वजारोहणाचा मान



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.25 )** - शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे हे दि. 25 व 26 जानेवारी 2026 रोजी अमरावती जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून प्रजासत्ताक दिनाच्या मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभास ते उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या उपस्थितीमुळे जिल्ह्यातील प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. दौऱ्याच्या कार्यक्रमानुसार रविवारी, दि. 25 जानेवारी रोजी रात्री 10.10 वाजता त्यांचे बडनेरा येथे आगमन होणार आहे. त्यानंतर ते अमरावती येथील शासकीय विश्रामगृहात मुक्काम करतील. सोमवारी, दि. 26 जानेवारी रोजी सकाळी 9.15 वाजता अमरावती शहरातील पोलीस मुख्यालयाच्या परेड मैदानावर भारताच्या 77 व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभात ते ध्वजारोहण करतील. या समारंभास जिल्ह्यातील प्रशासकीय अधिकारी, लोकप्रतिनिधी, स्वातंत्र्यसैनिक, विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

# वृक्षसंवर्धन बासनात गुंडाळून झाडांची कत्तल!

**कायदे सांगणारे तहसिलदार जेव्हा स्वत: कायदे तोडतात?**


**तहसील कार्यालय परिसरातील वृक्षतोडीने वृक्षप्रेमींमध्ये संताप**



झाडाची कत्तल केल्यामुळे बेघर झालेले पोपट आपले घर शोधताना



अश्या प्रकारे झाडाची कत्तल करण्यात आली त्यात नुकसान झालेली तहसील कार्यालय मधील परिसर



दिनांक 24 जानेवारी ला तहसील कार्यालय मधून बाहेर पडणारी तहसीलदार यांची गाडी आणि बाजूला उभी असलेली क्रेन



ज्या वाहणातून तोडलेलं झाडचे लाकूड बाहेर नेण्यात आले ते वाहन

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार, ( दि.25 )**- 'वृक्षसंवर्धनाचे धडे देणाऱ्या कार्यालयाच्या सावलीतच झाडांची कत्तल' असा धक्कादायक प्रकार चांदूर बाजार तहसील कार्यालय परिसरात उघडकीस आला आहे. तहसील कार्यालयाच्या आवारातील तीन कडुलिंबांची परवानगीविना तोड करण्यात आल्याने तालुक्यातील वृक्षप्रेमी, पर्यावरणप्रेमी आणि सजग नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

विशेष म्हणजे, याच परिसरात सामाजिक वनीकरण विभाग, कृषी कार्यालय, मृदा व जलसंधारण विभाग, रोजगार हमी योजना कार्यालय, भूमी अभिलेख कार्यालय यांसारखी महत्त्वाची शासकीय कार्यालये कार्यरत आहेत. रोज शेकडो नागरिकांची वर्दळ असलेल्या या ठिकाणी ही कडुलिंबांची झाडे उन्हाळ्याच्या तडाख्यात दिलासा देणारी सावली पुरवत होती. वसंत ऋतूमुळे काही प्रमाणात पाने गळत असली, तरी भर उन्हाळ्यात ही झाडे परिसरासाठी वरदान ठरत होती.

मात्र, कोणतीही अधिकृत परवानगी न घेता ही झाडे तोडण्यात आली. त्यामुळे पर्यावरण संरक्षणाच्या कायद्यांनाच हरताळ फासण्यात आल्याचा आरोप होत आहे. यासोबतच, या झाडांवर आश्रय घेणारे पोपट व इतर पक्षी बेघर झाले असून जैवविविधतेलाही मोठा धक्का बसला आहे.

> 'झाडे कोणी आणि कोणाच्या परवानगीने तोडली, याची मला कल्पना नाही. मात्र हा प्रकार अयोग्य आहे. दोषींवर कारवाई होणे गरजेचे आहे. याबाबत चौकशी केली जाईल.'
>
> **-लक्ष्मीकांत तिवारी,** निवासी नायब तहसीलदार

> '26 जानेवारीनिमित्त छाटणीबाबत सूचना दिल्या होत्या. परंतु झाडतोडीचा उद्देश नव्हता. तरीही दोषी आढळणाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल.'
>
> **-मनोज सोनारकर,** प्रभारी तहसीलदार, चांदूर बाजार

> 'तहसील कार्यालयातील वृक्षतोड किंवा छाटणीसाठी आमच्या कार्यालयाकडून कोणतीही परवानगी देण्यात आलेली नाही.'
>
> **-दिनेश वाळके,** वनपरिक्षेत्र अधिकारी, परतवाडा



झाडाची कत्तल केल्यावर परिसरात पडून असलेले कडुलिंब चे लाकूड.

### परवानगी नाही, लिलाव नाही थेट विक्रीचा संशय

या झाडतोडीसाठी कोणतीही लेखी परवानगी नसल्याचे तसेच शासकीय नियमांनुसार लिलाव प्रक्रिया न राबवता लाकडाची परस्पर विल्हेवाट लावण्याचा प्रयत्न झाल्याची चर्चा आहे. 'वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सांगण्यावरूनच ही कारवाई झाली' अशी कुजबुज प्रशासनात सुरू असल्याने प्रकरण अधिकच गंभीर बनले आहे.

### बळी कनिष्ठांचा, आदेश वरिष्ठांचे?

नेहमीप्रमाणे या प्रकरणात कनिष्ठ कर्मचाऱ्यांवर कारवाई होऊन वरिष्ठ अधिकारी नामानिराळे राहणार का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. मागील काही दिवसांपासून तहसील कार्यालयातील भोंगळ व बेजबाबदार कारभार चर्चेचा विषय ठरत असून, वरिष्ठ स्तरावरून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप होत आहे.

### जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने दखल घ्यावी

या प्रकाराची जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने गंभीर दखल घेऊन चौकशीचे आदेश द्यावेत, दोषी अधिकाऱ्यांची नावे जाहीर करून थेट जबाबदारांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी वृक्षप्रेमी व पर्यावरण कार्यकर्त्यांकडून करण्यात येत आहे. अन्यथा 'शासनाच्या कार्यालयातच झाडे सुरक्षित नसतील, तर पर्यावरण वाचवण्याच्या घोषणा म्हणजे निव्वळ ढोंग' अशी भावना बळावेल, असा इशाराही देण्यात येत आहे.



दिनांक 25 जानेवारी ला तहसील परिसरातील लाकूड गायब

> 'कडुलिंबाचे झाड मोठे व्हायला अनेक वर्षे लागतात. उन्हाळ्यात सावली देणाऱ्या झाडाची अशी अमानुष कत्तल केली जाते, हे अत्यंत दुर्दैवी आहे. वरिष्ठ अधिकारी प्रकरणाची परस्पर विल्हेवाट लावण्याच्या तयारीत होते. दोषींवर कारवाई झाली नाही, तर तीव्र आंदोलन करू.'
>
> **-आशिष झटाले,** सामाजिक कार्यकर्ते, शिरजगाव बंड

## समाजाला दिशा देणारे 'राजसी रसायन' हरपले

### डॉ. राजेंद्र राजोरिया यांचे निधन

**महासागर प्रतिनिधी**

**वरूड,( दि.25 )**-वैद्यकीय क्षेत्रातील दैदीप्यमान तारा, कुशल शैक्षणिक मार्गदर्शक, संवेदनशील समाजसेवक आणि बहुआयामी व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जाणारे इंडियन मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष तथा प्रसिद्ध नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. राजेंद्र राजोरिया यांचे आज पहाटे दु:खद निधन झाले. त्यांच्या अचानक जाण्याने संपूर्ण वैद्यकीय, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रावर शोककळा पसरली आहे.



'डॉ. राजेंद्र राजोरिया नावाचे राजसी रसायन' हे वर्णन त्यांच्या कार्यकर्तृत्वाला पूर्णत: सार्थ ठरते. वैद्यकीय, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा आणि आर्थिक अशा प्रत्येक सकारात्मक क्षेत्रात त्यांचा सक्रिय सहभाग होता. येणाऱ्या काळातील गरजा ओळखून समाजहिताचे उपक्रम राबविण्याची दूरदृष्टी त्यांच्यात होती. नेत्ररोग तज्ज्ञ म्हणून त्यांनी हजारो रुग्णांच्या आयुष्यात प्रकाश आणला. केवळ उपचारांपुरते न थांबता रुग्णांशी आपुलकीने संवाद साधणे, त्यांना मानसिक आधार देणे, गरजूंसाठी सवलती व मोफत तपासण्या आयोजित करणे, हा त्यांचा सेवाभावी स्वभाव होता. वैद्यकीय शिस्त, नैतिकता आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुरेख संगम त्यांच्या कार्यात दिसून येत असे.शिक्षण, संस्कृती व समाजकारणातही त्यांचे योगदान मोलाचे होते. तरुणांना प्रेरित करणे, गुणवत्तेला प्रोत्साहन देणे आणि सकारात्मक बदलांसाठी पुढाकार घेणे हे त्यांच्या जीवनाचे ध्येय होते. त्यांच्या निधनाने समाजाने एक दूरदृष्टी लाभलेले, प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व गमावले आहे. त्यांच्या कार्याचा आदर्श सदैव स्मरणात राहील.

## 4 ते 8 फेब्रुवारी 'आर्ट ऑफ लिव्हिंग युथ हॅप्पीनेस प्रोग्राम'चे आयोजन

**अमरावती**-अमरावतीत 'आर्ट ऑफ लिव्हिंग'तर्फे युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी 'युथ हॅप्पीनेस प्रोग्राम'चे आयोजन 4 ते 8 फेब्रुवारी दरम्यान गव्हर्नमेंट पॉलिटेक्निक कॉलेज, गाडगे नगर येथे करण्यात आले आहे. या पाच दिवसीय कार्यक्रमासाठी 'आर्ट ऑफ लिव्हिंग'च्या आंतरराष्ट्रीय फॅकल्टी सदस्य व TED& स्पीकर रश्मीन पुळेकर मुंबईहून उपस्थित राहणार आहेत. आयोजकांच्या माहितीनुसार, रश्मीन पुळेकर यांनी गेल्या दोन दशकांत भारत व परदेशात 2 हजारांहून अधिक कार्यशाळा घेतल्या असून 15 हजार तासांपेक्षा जास्त प्रशिक्षणाचा अनुभव त्यांना आहे. त्यांनी IIM, IIT, BITS, NIT, फर्ग्युसन कॉलेज, NIFT तसेच Cisco, TCS, Panasonic यांसारख्या संस्थांमध्ये मार्गदर्शन केले आहे.सध्याच्या तणावपूर्ण जीवनशैलीत युवकांमध्ये वाढणारा ताण, एकाग्रतेचा अभाव व आत्मविश्वासातील घट लक्षात घेता, या कार्यक्रमात तणावमुक्ती, आत्मविश्वास वृद्धी, सकारात्मक विचारसरणी व जीवनकौशल्यांवर भर देण्यात येणार आहे. कोर्स सकाळी व संध्याकाळी अशा दोन सत्रांत होणार असून अधिकाधिक युवकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## स्कायवॉकचे दिवास्वप्न अंतिम टप्प्यात

### आशियातील सर्वात लांब स्कायवॉकमुळे चिखलदऱ्याच्या पर्यटनाला नवी उभारी



**मारोती पाटणकर**

**चुरणी, ( दि. 25 )** - विदर्भाचे नंदनवन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चिखलदऱ्यासाठी अत्यंत दिलासादायक आणि अभिमानास्पद बातमी आहे. येथील बहुप्रतिक्षित स्कायवॉक प्रकल्पाचे मुख्य बांधकाम पूर्ण झाले असून आता केवळ काच बसविणे व काही तांत्रिक कामे शिल्लक आहेत. हरिकेन पॉईंट ते गोराघाट पॉईंट या दोन निसर्गरम्य ठिकाणांना जोडणारा हा स्कायवॉक तब्बल 407 मीटर लांबीचा असून तो आशिया खंडातील सर्वात लांब स्कायवॉक म्हणून ओळख निर्माण करणार आहे.

2019 मध्ये सुरू झालेल्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी सुमारे 40.26 कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. शासनाने मार्च 2026 पर्यंत प्रकल्प पूर्ण करण्याची अंतिम मुदत निश्चित केली असून त्यानुसार ठेकेदार संस्थेकडून कामाचा वेग वाढविण्यात आला आहे. सध्या संपूर्ण लोखंडी स्ट्रक्चर उभे राहिले असून डेकचे काम पूर्ण झाले आहे. त्यामुळे हा प्रकल्प आता अंतिम टप्प्यात पोहोचल्याचे स्पष्ट झाले आहे.

स्कायवॉक पूर्ण झाल्यानंतर चिखलदऱ्याच्या पर्यटनाला मोठी चालना मिळणार आहे. आधीच जंगल सफारी, व्याघ्र प्रकल्प, थंड हवामान आणि निसर्गसौंदर्यासाठी प्रसिद्ध असलेल्या चिखलदऱ्यात स्कायवॉक हे आणखी एक जागतिक दर्जाचे आकर्षण ठरेल. देश-विदेशातील पर्यटकांची संख्या वाढण्याची शक्यता असून त्याचा थेट लाभ स्थानिक अर्थव्यवस्थेला होणार आहे. हॉटेल व्यवसाय, वाहतूक सेवा, पर्यटक मार्गदर्शक, हस्तकला विक्री, स्थानिक खाद्यव्यवसाय आणि इतर छोट्या-मोठ्या उद्योगांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होतील. दरीच्या कडेला उभारण्यात आलेला हा स्कायवॉक पर्यटकांना थरारक व अविस्मरणीय अनुभव देणारा ठरणार आहे. पारदर्शक काचेवरून चालताना खोल दरीचे विहंगम दृश्य पाहण्याचा अनुभव पर्यटकांसाठी आकर्षणाचे मुख्य केंद्र बनेल, असा विश्वास पर्यटन क्षेत्रातील जाणकार व्यक्त करीत आहेत. प्रकल्प अंतिम टप्प्यात आल्याने स्थानिक नागरिकांमध्येही आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### कामाची सद्यस्थिती

स्कायवॉकचे संपूर्ण लोखंडी स्ट्रक्चर उभे राहिले असून डेकचे काम पूर्ण झाले आहे. सध्या काच बसविणे, सुरक्षा उपाययोजना, रेलिंग, तसेच तांत्रिक तपासण्या सुरू आहेत. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार पुढील चार ते पाच महिन्यांत उर्वरित काम पूर्ण होण्याची शक्यता असून मार्च 2026 पर्यंत स्कायवॉक पर्यटकांसाठी खुला करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

## महिलांनी स्वत:साठी जगायला शिकले पाहिजे - विठ्ठल कांगणे

**मुलींच्या मोबाईलवरील अतिरेकी वापरावर चिंता; महिलांनी स्वावलंबी व्हावे**



**महासागर प्रतिनिधी**

**नांदगाव खंडेश्वर, ( दि.25 )**-कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने आयोजित भव्य शेतकरी व महिला मेळाव्यात परभणी येथील प्रसिद्ध वक्ते व सामाजिक प्रबोधनकार विठ्ठल कांगणे यांनी महिलांनी जीवन जगत असताना केवळ कुटुंबापुरते मर्यादित न राहता स्वत:साठीही जगायला शिकले पाहिजे, असे प्रतिपादन केले. शाळकरी मुलींमध्ये वाढत चाललेल्या मोबाईलच्या अतिरेकी वापरावर त्यांनी तीव्र चिंता व्यक्त केली.

कांगणे म्हणाले, 'आजच्या घडीला अनेक शाळकरी मुली अभ्यासापेक्षा मोबाईलमध्ये अधिक गुंतून जात आहेत. सोशल मीडिया, व्हिडीओ गेम्स आणि अनावश्यक ॲप्स यांचा अतिरेक त्यांच्या शैक्षणिक प्रगतीसह मानसिक आरोग्यावरही विपरीत परिणाम करत आहे. पालकांनी मुलींच्या मोबाईल वापरावर योग्य नियंत्रण ठेवणे अत्यावश्यक आहे.' मोबाईल हे ज्ञान आणि प्रगतीचे साधन असले तरी त्याचा अतिरेक घातक ठरतो, हेही त्यांनी अधोरेखित केले. महिलांच्या स्वावलंबनावर भर देताना ते म्हणाले, 'महिलांनी शिक्षण, व्यवसाय आणि नोकरीच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम झाले पाहिजे. आर्थिक स्वावलंबनामुळे आत्मविश्वास वाढतो, निर्णयक्षमता बळकट होते आणि कुटुंबासोबत समाजाचाही सर्वांगीण विकास होतो.'

मेळाव्याला उपस्थित महिलांनी व विद्यार्थिनींनी त्यांच्या विचारांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. महिलांमध्ये स्वावलंबनाची प्रेरणा निर्माण होण्यास तसेच शाळकरी मुलींमध्ये मोबाईल वापराबाबत जनजागृती होण्यास या कार्यक्रमामुळे मोठी मदत होईल, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले. मेळाव्यादरम्यान कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने 'शेतकरी सन्मान योजना' सुरू करण्यात आली. महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन, हळदीकुंकू कार्यक्रम तसेच भव्य कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. हजारोंच्या संख्येने शेतकरी व महिलांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे संचालन विलास मारोटकर यांनी केले, प्रास्ताविक डॉ. राजेंद्र पांडे यांनी, तर आभार धनंजय मेटकर यांनी मानले.

### महिलांच्या स्वावलंबनासाठी पुढाकार - सुरेखा ठाकरे

जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष सुरेखा ठाकरे यांनी महिलांनी स्वत:च्या पायावर उभे राहावे, असे आवाहन केले. कृषी उत्पन्न बाजार समितीने महिलांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी स्वतंत्र वेबसाईट सुरू करावी, अशी सूचना त्यांनी केली. महिलांनी बचत गटांच्या माध्यमातून उद्योग सुरू करावेत व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या योजनांचा लाभ घ्यावा, असेही त्या म्हणाल्या.

### तालुक्याचे ऋण कधीही न फिटणारे - अभिजित ढेपे

आपल्या वाढदिवसानिमित्त झालेल्या सत्काराला उत्तर देताना सहकार नेते अभिजित ढेपे म्हणाले, 'या तालुक्याने मला वडिलांप्रमाणे प्रेम दिले. राजकीय वारसा नसतानाही जनतेने मला साथ दिली. त्यामुळे या तालुक्याचे ऋण मी कधीही विसरणार नाही.' सर्वपक्षीय नेत्यांना सोबत घेऊन तालुक्याच्या विकासासाठी पुढाकार घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

RNINO-46975/1985
Dainik Mahasagar Amravati
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak; printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no. 9518934504.
**Group Editor-in-Chief and Managing Director**- Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७५/१९८५
महासागर अमरावती
**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक, अमरावती, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक**

